| MHBI170004602019 | दाखल दिनांक | : १९.०७.२०१९ |
|---|---|---|
| | नोंदणी दिनांक | : २२.०७.२०१९ |
| | निकाल दिनांक | : १२.०३.२०२६ |
| | कालावधी | : ०६ व ०७ म २४ दि |

| | |
|---|---|
| | **निशाणी क्र.४५** |
| | **प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, न्यायालय वडवणी, जि. बीड.**<br>(पिठासीन अधिकारी श्री विष्णु द. गिते)<br>न्यायनिर्णयाचा दिनांक १२/०३/२०२६<br>**संक्षिप्त फौजदारी खटला क्र.१११/२०१९** |
| | अपराध क्रमांक : ५४/२०१९<br>पोलीस स्टेशन : वडवणी, ता. वडवणी, जि. बीड. |
| फिर्यादी | महाराष्ट्र सरकार,<br>तर्फे पोलीस ठाणे वडवणी, ता. वडवणी, जि. बीड. |
| फिर्यादीतर्फे वकिल | श्री. ए. डी. साखरे, सहाय्यक सरकारी वकिल. |
| आरोपी | गणेश श्रीमंतराव माने,<br>वय – २८ वर्षे, रा. ताडसोन्ना, ता. वडवणी, जि. बीड. |
| आरोपीतर्फे वकिल | श्री. एस. ए. लंगे. |

**[फौजदारी मॅन्युअलमधील प्रकरण क्र.६ परीच्छेद ४४]**

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याची तारीख | ०८.०४.२०१९ |
| प्रथम खबरी अहवाल दाखल झाल्याची तारीख | ०८.०४.२०१९ |
| दोषारोपपत्राची तारीख | १९.०७.२०१९ |
| दोषारोप ठेवल्याची तारीख | १८.११.२०२२ |
| पुराव्यास सुरुवात झाल्याची तारीख | ११.०४.२०२३ |
| निकाल राखून ठेवल्याची तारीख | -- |
| निकालाची तारीख | १२.०३.२०२६ |
| शिक्षा दिली असल्यास त्याची तारीख | -- |

आरोपीची सविस्तर माहिती.

| आरोपी क्रमांक | आरोपीचे नांव | अटकेची तारीख | जामीनावर सुटकेची तारीख | दोषारोपाचे कलम | आरोपीची निर्दोष सुटका झाली कि आरोपीला सजा झाली. | आरोपीची शिक्षा | फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ४२८ च्या उद्देशाने खटल्यादरम्यान आरोपीचा अटकेचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | गणेश श्रीमंतराव माने | ०९.०४.२०१९ रोजी नोटीस | १४.०३.२२ | भादवि कलम २८६ | निर्दोष सुटका १२.०३.२०२६ | -- | -- |

<u>सरकारी साक्षीदार/बचावपक्षाचे साक्षीदार/न्यायालयाच्या साक्षीदारांची यादी</u>.

अ. सरकारी साक्षीदारः-

| **दर्जा** | **साक्षीदाराचे नांव व निशाणी क्रमांक** | **पुराव्याचे स्वरुप** |
|---|---|---|
| सा.क्र.१ | रेवणनाथ चंद्रकांत दुधाणे (नि.क्र.१३ लगत) | फिर्यादी |
| सा.क्र.२ | जीवन रघुनाथ जाधव (नि.क्र.१३ लगत) | पंच साक्षीदार |

ब. बचाव पक्षाचे साक्षीदार, असल्यासः-

| दर्जा | साक्षीदाराचे नांव व निशाणी क्रमांक | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| निरंक | | |

क. न्यायालयातर्फे साक्षीदार, असल्यासः-

| दर्जा | साक्षीदाराचे नांव व निशाणी क्रमांक | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| निरंक | | |

<u>सरकार पक्षातर्फे निशाणी क्रमांक दिलेल्या दस्तांची यादी</u>.

अ. सरकार पक्षातर्फेः-

| अनुक्रमांक | निशाणी क्रमांक | दस्तऐवजाचे वर्णन. |
|---|---|---|
| -- | -- | -- |

ब. बचाव पक्षाने मान्य केलेले दस्तऐवजः-

| अनुक्रमांक | निशाणी क्रमांक | दस्तऐवजाचे वर्णन. |
|---|---|---|
| -- | -- | -- |

क. न्यायालयातर्फे निशाणी देण्यात आलेले दस्तः-

| **अनुक्रमांक** | **निशाणी क्रमांक** | **दस्तऐवजाचे वर्णन.** |
|---|---|---|
| ०१ | १७ | फिर्याद |
| ०२ | १८ | प्रथम खबर अहवाल |
| ०३ | २३ | जप्ती पंचनाम्यावरील सही |

ड. जप्त वस्तुंचे वर्णनः–

| | | |
|---|---|---|
| वस्तूंचा नंबर **१८/२०१९** | | वस्तूचे वर्णन |
| | **१.** | सिंगल आवाजाच्या तोफांचे ४३ बॉक्स, प्रत्येक बॉक्स मध्ये ४० तोफा, ज्यांची एकुण किंमत रु.४,३०,०००/– |
| | **२.** | स्टार चॅम्पीयन कंपनीचा सुतळी बॉम्बचा एक बॉक्स, प्रत्येक बॉक्स मध्ये १५० पॅकेट, ज्यांची एकुण किंमत रु.२७,०००/– |
| | **३.** | फुलझडी क्लासीक ग्रिन व रेड कलरचे एकुण ३६० बॉक्स, प्रत्येक बॉक्स मध्ये ३६० पॅकेट, ज्यांची एकुण किंमत रु.८६,४००/– |
| | **४.** | श्री ओसवाल कंपनीचे बिजली रेबाळ फटाक्याचे ४ बॉक्स, प्रत्येक बॉक्स मध्ये ३०० पॅकेट, ज्यांची एकुण किंमत रु.३,००,०००/– |
| | **५.** | नरेश कंपनीची ५००० फटाक्यांची लड असलेले ८ बॉक्स ज्यांची किंमत रु.६६,४००/– |
| **मुद्देमालाची एकुण रक्कम :– रु.९,०९,८००/–** | | |

## न्यायनिर्णय
### (घोषित दिनांक १२/०३/२०२६)

**१.** आरोपी विरुध्द भारतीय दंड विधान, १८६० चे कलम २८६ अन्वये खटला पोलीस ठाणे वडवणी, जि. बीड तर्फे दाखल करण्यात आला.

**२.** फिर्यादमध्ये असे नमुद करण्यात आले आहे की, दि.०८.०४.२०१९ रोजी १९.०० वा. सुमारास वडवणी, जि. बीड येथील चिंचवण रोड लगत असलेल्या चाटे यांच्या पत्र्याच्या गाळ्यात छापा मारला असता गणेश श्रीमंतराव माने (आरोपी) हा मानवी जीवन धोक्यात येईल अथवा अन्य कोणत्याही व्यक्तीला दुखापत किंवा क्षती पोहचण्याचा संभव असेल इतक्या बेकायदेशीरपणे, हयगयीने आणि मानवी जीवितास पोहचणा–या कोणत्याही संभाव्य धोक्यापासून सुरक्षित राहण्यास पुरेसा इतका बंदोबस्त न करता ज्वालाग्रही स्फोटक पदार्थ फटाके यांची चोरटी विक्री करण्याच्या उद्देशाने साठवणुक केल्याने तो जप्त करण्यात आला. सबब, आरोपी विरुध्द दोषारोपपत्र दाखल करण्यात आले. माझे पुर्वीचे सन्माननीय पिठासीन अधिकारी यांनी आरोपी विरुध्द निशाणी क्र.१३ खाली भारतीय दंड विधान, १८६० चे कलम २८६ प्रमाणे दोषारोप निश्चित केले.

**३.** आरोपीला त्याचे विरुध्द नोंदविण्यात आलेला संपरीक्षा अभिलेख मराठीतुन समजावुन सांगण्यात आला असता त्याने गुन्हा कबुल नसल्याचे सांगितले. त्याचप्रमाणे

आरोपी विरुध्द खटला चालविण्यात आला. आरोपीविरुध्द गुन्हादर्शक पुरावा मिळून आल्याने फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३(१)(ब) प्रमाणे आरोपीचा जबाब (नि.क्र.४२) नोंदविण्यात आला.

**४.** अभियोग पक्षातर्फे विद्वान सरकारी वकील आणि आरोपीतर्फे विद्वान वकील श्री एस. ए. लंगे यांचा दि.१६.०२.२०२६ रोजी युक्तीवाद ऐकला.

**५.** सदर खटल्यातील संपूर्ण पुरावा व कागदपत्रे पाहून खालीलप्रमाणे मुद्दे निर्धारीत केले व त्यास मी खालील नमुद कारणास्तव समोर दर्शविलेल्या निष्कर्षा प्रत पोहोचलो.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| ०१. | अभियोग पक्ष हे शाबीत करतात काय की, दिनांक ०८.०४.२०१९ रोजी १९.०० वाजताचे दरम्यान वडवणी, जि. बीड येथील चिंचवण रोड लगत असलेल्या पत्र्याच्या गाळ्यात आरोपीच्या ताब्यात मानवी जीवितास धोका पोहचविणारे ज्वालाग्रही स्फोटक पदार्थ फटाके मिळुन आले आणि त्या अन्वये भारतीय दंड विधान, १८६० चे कलम २८६ नुसार अपराध केला आहे ? | **नाही.** |
| ०२. | आदेश काय ? | **अंतिम आदेशाप्रमाणे.** |

## <u>कारणमिमांसा</u>

**६.** आरोपीवर ठेवण्यात आलेले आरोप सिध्द करण्याकरीता अभियोग पक्षाने दोन साक्षीदार तपासले आहेत. आरोपीने स्वतःच्या बचाव कामी कोणतेही साक्षीदार तपासले नाहीत.

**<u>मुद्दा क्रमांक १ करीताः</u>–**

**७.** रेवणनाथ चंद्रकांत दुधाणे (सा.क्र.१)(नि.क्र.१३ लगत) हे सदर प्रकाणातील फिर्यादी आहेत. त्यांनी त्यांच्या पुराव्यात असे सांगितले की, दिनांक ०८.०४.२०१९ रोजी त्यांना गुप्त बातमीदाराने अशी बातमी दिली होती की, चिंचवण रोडवर चाटे यांचे पत्राचे गाळ्यात स्फोटक पदार्थ साठवून आरोपी त्याची चोरटी विक्री करीत आहे. त्यानुसार त्यांनी दोन पंचांना सोबत घेवून माहिती मिळालेल्या ठिकाणी १९.०० वाजता पाहणी केली असता तेथे त्यांना

आरोपी गणेश श्रीमंतराव माने मिळून आला. त्यांनी पंचांसमक्ष लाईटच्या उजेडामध्ये गोडाऊनची पाहणी केली असता तेथे पाच कंपन्यांचे स्फोटक पदार्थ मिळून आले. त्या स्फोटक पदार्थांची एकूण किंमत रक्कम रु.९,०९,८००/– इतकी होती. साक्षीदार यांनी आरोपीला त्याचे जवळ स्फोटक पदार्थ बाळगण्याच्या परवान्याबाबत विचारले असता आरोपीने त्याच्याकडे कोणताही परवाना नसल्याचे सांगितले. त्यानंतर पी. एस. आय. सागडे यांनी दोन पंचांसमक्ष जप्ती पंचनामा करून आरोपीच्या ताब्यातून सदरील स्फोटक पदार्थ जप्त केले. आरोपीच्या ताब्यात स्फोटक पदार्थ मिळून आल्याने साक्षीदार यांनी आरोपी विरुद्ध भारतीय दंड विधान संहिता कलम २८६ प्रमाणे खालील गुन्ह्यासाठी फिर्याद/प्रथम खबरी अहवाल (नि.क्र.१७ आणि १८) दाखल केली. थोडक्यात, सदर साक्षीदाराने दाखल केलेली फिर्याद सिद्ध केलेली आहे.

८. जीवन रघुनाथ जाधव (सा.क्र.२)(नि.क्र.१३ लगत) हे सदर प्रकरणामध्ये पंच साक्षीदार आहेत. त्यांनी त्यांच्या पुराव्यात असे सांगितले की, दिनांक ०८.०४.२०१९ रोजी पोलिसांनी त्यांना पंचनाम्यासाठी बोलाविले नसून त्यांचे समोर कोणताही पंचनामा केलेला नाही. साक्षीदाराने पंचनाम्यातील अ.क्र.२ वरील त्यांची सही ओळखली परंतु त्यातील मजकूरा बाबत माहिती नसल्याचे कथन केले. पंच साक्षीदाराने अभियोग पक्षास सहाय्य केले नाही, त्यामुळे अभियोग पक्षाने सदर साक्षीदाराला भारतीय पुरावा अधिनियम कलम १५४ नुसार उलट तपासणीत विचारता येणारे प्रश्न विचारण्याची परवानगी अभियोग पक्षाने मागितल्यामुळे तसेच प्रश्न विचारण्याची संधी देण्यात आली. उलटतपासणीमध्ये सदर साक्षीदाराने अभियोग पक्षास सहाय्य होईल असे कोणतेही कथन अभिलेखावर आले नाही.

**९.** आरोपी विरुध्द गुन्हा सिध्द करण्यासाठी अभियोग पक्षाला आरोपीच्या ताब्यात मानवी जीवितास धोका पोहचविणारे ज्वालाग्रही स्फोटक पदार्थ फटाके मिळुन असल्याचे सिध्द होणे जरुरी आहे. सदर प्रकरणात जप्ती हा महत्त्वाचा मुद्दा आहे, परंतु जप्ती पंचनामा करणारे पी.एस.आय. श्री सागडे तसेच जप्ती पंच क्र.२ यांची साक्ष अभियोग पक्षाने तपासलेली नाही. सदर साक्षीदारांना वारंवार साक्षी समन्स निर्गमित करण्यात आलेले आहेत, परंतु त्यांची उपस्थिती अभियोग पक्षास मिळविता आली नाही. पंच साक्षीदार नामे जीवन जाधव (सा.क्र.२) यांनी अभियोग पक्षास सहकार्य केले नाही. सबब, सदर प्रकरणातील जप्ती पंचनामा सिद्ध झालेला नसल्यामुळे जप्त मुद्देमाल हा आरोपीच्याच

ताब्यातुन जप्त झाला आहे ही बाब सिद्ध झालेली नाही.

**१०.** याउपरही जप्त मुद्देमाल न्याय वैद्यक प्रयोग शाळेकडे पाठविण्यात आला होता किंवा नाही याबाबत कोणताही पुरावा अभिलेखावर आलेला नाही. अभिलेखावर दाखल असलेल्या कागदपत्रावरुन जप्त मुद्देमाल न्याय वैद्यक प्रयोगशाळेकडे पाठविण्यात आला होता याबाबत कोणताही कागदोपत्री पुरावा अभिलेखावर उपलब्ध नाही. सबब, भा.दं.वि. कलम २८६ मधील तरतुदीप्रमाणे आरोपीने स्फोटक पदार्थ निष्काळजीने हाताळले व त्यामुळे मानवी जिवीतस धोका निर्माण केला याबाबी सिद्ध होत नाहीत. सबब, मुद्दा क्र.१ चे निष्कर्ष नकारार्थी नोंदवित आहे.

**मुद्दा क्रमांक २ करीताः–**

**११.** फिर्यादी नामे श्री दुधाने (सा.क्र.१) यांनी त्यांच्या सरतपासामध्ये असे कथन केले आहे की, जप्त मुद्देमाल हा स्फोटक पदार्थ असल्याने सुरक्षिततेच्या कारणास्तव याप्रकारणातील तपासी अंमलदार यांनी योग्य तो पत्र व्यवहार करुन जप्त मुद्देमाल परवानाधारक विक्रेत्याकडे जमा केला आहे, परंतु असा कोणताही पत्र व्यवहार केला असल्याचे अभिलेखावरुन दिसून येत नाही. जप्त मुद्देमाल कोणत्या ठिकाणी ठेवण्यात आलेला आहे याबाबत कोणताही पुरावा अभिलेखावर आलेला नसल्यामुळे सदर मुद्देमाल जप्ती / तपासी अधिकारी यांनी योग्य त्या ठिकाणी ठेवला असेल असे गृहित धरता येईल. सदर प्रकरणातील जप्त मुद्देमाल हा फटाके/स्फोटक पदार्थ स्वरुपाचा असल्यामुळे तो धोकादायक व ज्वलंतशील आहे. सबब, असा मुद्देमाल हा मुद्देमाल खोलीत दिर्घकाळ ठेवणे सुरक्षीत नाही. सबब, अपील कालावधी संपल्यानंतर संबंधित पोलीस ठाणे मार्फत सदर मुद्देमालाची कायद्यातील तरतुदीनुसार / योग्य त्या नियमानुसार योग्य त्या सुरक्षीत ठिकाणी नष्ट करण्यात यावा किंवा योग्य त्या पद्धतीने सदर मुद्देमालाची विल्हेवाट लावावी. मुद्देमाल नष्ट करताना पंचांच्या उपस्थितीत पंचनामा करावा व आवश्यक असल्यास संबंधित तज्ज्ञ अधिकारी यांच्या देखरेखीखाली मुद्देमालाची योग्य ती विल्हेवाट लावुन त्याबाबत सविस्तर पंचनामा तयार करुन अभिलेखावर दाखल करणे आवश्यक आहे.

**१२.** सदर प्रकरणातील तपासी अधिकारी व इतर साक्षीदार यांची साक्ष घेण्यास अभियोग पक्ष असमर्थ ठरला आहे. जप्त केलेला मुद्देमाल हा आरोपीच्या ताब्यातुनच जप्त

केलेला आहे ही बाब अभियोग पक्षाने सबळ पुरावा देवून सिध्द केलेले नाही. त्यामुळे अभिलेखावर असलेला पुरावा हा आरोपी विरुध्दचा दोषारोप सिध्द करण्यास पुरेसा नाही. सबब, मुद्दा क्र.२ करीता खालील आदेश पारीत करीत आहे.

**आ दे श**

१) आरोपी **गणेश श्रीमंतराव माने** यांस फौजदारी प्रक्रीया संहितेचे कलम २५५(१) अन्वये भारतीय दंड विधान, १८६० चे कलम २८६ अन्वये च्या गुन्ह्यातून निर्दोष मुक्त करण्यात येत आहे.

२) आरोपीचे जामीन बंधपत्र व जामीन कदबा रद्द करण्यात येत आहे व आरोपीच्या जमनातदारास मुक्त करण्यात येत आहे.

३) जप्त मुद्देमाल सिंगल आवाजाच्या तोफांचे ४३ बॉक्स, प्रत्येक बॉक्स मध्ये ४० तोफा, स्टार चॅम्पीयन कंपनीचा सुतळी बॉम्बचा एक बॉक्स, प्रत्येक बॉक्स मध्ये १५० पॅकेट, फुलझडी क्लासीक ग्रिन व रेड कलरचे एकुण ३६० बॉक्स, प्रत्येक बॉक्स मध्ये ३६० पॅकेट, श्री ओसवाल कंपनीचे बिजली रेबाळ फटाक्याचे ४ बॉक्स, प्रत्येक बॉक्स मध्ये ३०० पॅकेट आणि नरेश कंपनीची ५००० फटाक्यांची लड असलेले ८ बॉक्स इ. मुद्देमालाची अपील कालावधी संपुष्ठात आल्यानंतर योग्य त्या नियमाप्रमाणे विल्हेवाट लावण्यात यावी. आवश्यक तो पंचनामा तयार करुन अभिलेखावर दाखल करण्यात यावा.

४) आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ कलम ४३७–अ च्या पुर्ततेसाठी रु.७,५००/– रुपयांचे बंधपत्र व जामीनदाराचे जामीनखत सात दिवसांचे आत सादर करावे.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला.)

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by VISHNU DATTARAO GITE
Date: 2026.03.13 17:15:59 +0530

**दिनांकः १२/०३/२०२६.**

**( विष्णु द. गिते )**
**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, वडवणी,**
**जि. बीड.**

**प्रमाणपत्र**

मी अधिकथन करतो की, पी.डी.एफ. करुन अपलोड केलेल्या न्यायनिर्णय/आदेश/ पुरावा मधील शब्द नि शब्द हे मुळ न्यायनिर्णय/पुरावा/आदेशाप्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| न्यायालयाचे नाव | :- | **श्री. विष्णु द. गिते,**<br>दिवाणी व फौजदारी न्यायाधीश,<br>वडवणी, जि. बीड. |
| लघुलेखकाचे नाव | :- | राजेश आर. कुलकर्णी |
| घोषित दिनांक | :- | १२/०३/२०२६ |
| न्यायनिर्णय/ आदेश/ पुराव्यावर पिठासीन अधिकारी यांनी केलेल्या स्वाक्षरीचा दिनांक | :- | १२/०३/२०२६ |
| अपलोड केल्याचा दिनांक | :- | १२/०३/२०२६ |